ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 4 | DECEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

फळबाग योजना व शरदचंद्रजी पवार

प्रा.डॉ. विश्वनाथ पवार
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

प्रस्ताविक:

शरद पवार स्वत: शेतकरी कुटुंबात जन्मले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची अडी—अडचणींची त्यांना चांगली जाण होती. सन १९९० मध्ये शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना फलोत्पादन कार्यक्रम राबविला. यामुळे १० वर्षात १० लाख हेक्टर क्षेत्र फलोत्पादन लागवडीखाली आले. हा प्रयोग राष्ट्रीय पातळीवरही 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियान' म्हणून राबविण्यात आला १०० टक्के अनुदानावर राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला.

शेतीशी नाते:—

शरद पवारांचा दिनांक १२ डिसेंबर १९४० रोजी काटेवाडी तालुका बारामती येथे शेतकरी कुटुंबात जन्म झाला. वडील गोविंदराव व मातोश्री शारदाबाई स्वत: शेतावरती राबत होते. शरद पवार स्वत: शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे सामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नांची, त्यांच्या अडी—अडचणींची, त्यांना चांगली जाण होती महाराष्ट्रात १२ टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्र बागायती खाली येऊ शकणार नाही असा बर्वे कमिशनचा रिपोर्ट होता.[१] मुबलक पाणीपुरवठा झाल्याशिवाय शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारणार नाही हे शरद पवार यांनी जाणले होते. महाराष्ट्रातील ८५ तालुके कायम दुष्काळी असल्याचा तज्ञांचा निर्वाळा होता. त्यात बारामती तालुक्याचा ही समावेश होता.

पाणी संवर्धनाची सुरुवात बारामतीतून:

बारामती तालुक्याची पावसाची वार्षिक सरासरी १५ ते २० इंच इतकी कमी होती. बारामतीचा दक्षिणेचा भाग निरा कालव्यामुळे ओलीता खाली होता. मात्र त्याहूनही जास्त भागाला पाण्याचे दुर्भिक्ष होते. शरद पवारांनी कोरडवाहू गावांची पाहणी करुन एक योजना राबविली गावोगावचे ओढे, नाले असे पाण्याचे प्रवाह, पावसाच्या वाहून जाणाऱ्या पाण्याचा थेंब न थेंब अडवून तिथेच जिरविण्याचा शास्त्रीय पद्धतीने केलेला प्रयोग यशस्वी केला. पहिला तलाव तांदुळवाडी या दुष्काळी गावात बांधण्यात आला. १९६४ ते १९६६ या कालावधीत बारामतीच्या कोरडवाहू गावात ३०० (गावतळी) तलाव बांधण्यात आले. यामुळे उजाड माळरान हिरवेगार झाले.[२]

शेतीशी जडले नाते:

निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी असे म्हटले आहे की, 'या शेताने लळा लावला असा—असा की मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द झालो'. शरद पवारांचे शेतीशी असेच नाते जोडले गेले आहे. त्यांनी

सन १९७१ मध्ये बारामती कृषी उद्योग प्रतिष्ठानची स्थापना केली. सन १९७२ मध्ये त्यांनी वसंतराव नाईक मंत्रिमंडळात अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. सन १९७६ मध्ये कृषी, पाणलोट क्षेत्रविकास व खारजमिनी या खात्याचा कार्यभार स्वीकारला. तर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून चार वेळा पदभार यशस्वीपणे पार पडला. या काळात कृषी विकासावर त्यांनी भर दिला. तर दोन वेळा संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये कृषीमंत्री पदाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.[३]

ऐतिहासिक कर्जमाफी:

शरद पवार यु.पी.ए. सरकारमध्ये कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांची व शेतमजुरांची कर्जाच्या विळख्यातून सुटका होण्यासाठी सन १९९७ ते २००७ पर्यंत कर्जामध्ये अडकलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे कृषीकर्ज व्याजासह माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. कृषीमंत्री शरद पवार यांनी ७१ हजार कोटी रुपयांचे कृषीकर्ज व्याजासह माफ करून लाखो शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून इतिहास घडविला.[४] सरकारच्या कर्जमाफीचा फायदा महाराष्ट्रातील ८० लाख शेतकऱ्यांना झाला. १४ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाली.[५]

क्रांतिकारक फळबाग योजना:

सन १९९० मध्ये शरद पवार महाराष्ट्र राज्याचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. त्यांनी फलोत्पादन कार्यक्रम हा रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्याचा अत्यंत महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. या निर्णयामुळे प्रतिवर्षी एक लाख हेक्टर क्षेत्र याप्रमाणे १० वर्षात १० लाख हेक्टर क्षेत्र फलोत्पादन लागवडीखाली आले.[६]

शरद पवारांनी फलोत्पादन वाढीच्या कार्यक्रमास अधिकाधिक चालना मिळण्यासाठी फलोत्पादन दृष्टिकोनातून राज्याचे सहा प्रमुख विभाग केले. फलोत्पादनाच्या क्षेत्रात कोकणाचा 'कॅलिफोर्निया' बनविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयोग हाती घेतला. आंबा, नारळ, काजू, अननस व मसाल्याचे पदार्थ यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. खानदेशावर केळी पिकांसाठी लक्ष केंद्रित केले. नागपूर विभागातील संत्रा उत्पादनावर भर देण्यात आला. राज्याच्या मध्य व दक्षिण पूर्व भागावर द्राक्ष पिकांवर लक्ष देण्यात आले. मराठवाड्यामध्ये द्राक्षे व केळी यांवरती लक्ष दिले. पश्चिम महाराष्ट्रात आंबा, चिकू, काजू, नारळ, फणस, आवळा, चिंच, सीताफळ यावरती लक्ष केंद्रित करण्यात आले.[७]

शरद पवारांनी फळबाग लागवडीची रोजगार हमी योजनेशी सांगड घातली या योजनेअंतर्गत आंबा, काजू, नारळ, चिक्कू, फणस ,संत्रा, मोसंबी, पेरु, डाळिंब, अंजीर, चिंच, सीताफळ, रामफळ आवळा, बोर, जांभूळ, कोकम, चारोळी, लीची यांच्या लागवडीचा कार्यक्रम महाराष्ट्रभर राबविण्यात आला.[८]

फळबाग लागवडीबाबत शेतकऱ्यांना कमीत—कमी ०.२० हेक्टर पासून जास्तीत जास्त ४ हेक्टरपर्यंत मर्यादा घालण्यात आली. अल्प व अत्यल्प शेतकरी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती, विमुक्त जाती यांच्या शेतावर १०० टक्के अनुदानावर हा उपक्रम राबविण्याचा निर्णय शरद पवारांनी घेतला. ग्रामपंचायती, विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील संस्था यांना किमान ०.२० हेक्टर व कमाल १० हेक्टर पर्यंतची मर्यादा घालण्यात आली.

दिनांक २६ सप्टेंबर १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचा वार्षिक समारंभ पुण्यात झाला. समारंभात बोलताना मुख्यमंत्री शरद पवार म्हणाले 'राज्यातील ७० लाख हेक्टर जमीन पडीक असून या जमिनीवर फळबाग लावल्याशिवाय सरकार स्वस्त बसणार नाही'[९] राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण ८५ ते ८७ टक्के असल्याने अल्प व अत्यल्प भूधारक यांच्या शेती पद्धतीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी व पावसाच्या लहरीपणामुळे या शेतकर्यांच्या वाट्याला सदैव येणारी आर्थिक दुर्बलता घालविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सर्व राज्यभर फळझाडे लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला.[१०]

बाग योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. मात्र एक अट घालण्यात आली की दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी फळझाडे जिवंत राहण्याचे प्रमाण ७५ टक्के असणे आवश्यक होते. याचा अर्थ दुसऱ्या वर्षी फळझाडे जगण्याचे प्रमाण ७५ टक्के होऊन कमी असेल तर शेतकऱ्याने स्वखर्चाने

नांग्याभरणी केली पाहिजे. अन्यथा शेतकरी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी अनुदानास पात्र राहणार नाही.[११] या पाठीमागे शासनाची भूमिका अशी होती की शेतकऱ्यांनी फळबाग वाढविण्यामध्ये आत्मीयता दाखवावी.

रोपवाटिका:

महाराष्ट्राच्या११ जिल्ह्यातील ६२ तालुक्यात नवीन फळरोपवाटीकांची स्थापना करण्यात आली. अस्तित्वात असणाऱ्या रोपवाटीकांचे सुदृढीकरण करण्यात आले. पश्चिम घाट क्षेत्रात नवीन फळ रोप वाटिका स्थापन करण्यात आल्या. फळरोपवाटीकांवर नवीन विहिरी खोदणे, पॉटिंग शेड, स्टोअर शेड, कुंपण घालणे, रस्ते बांधणे तसेच मशिनरी साहित्य पुरविण्यात आले.[१२]

फळबाग योजनेची रोजगार हमी योजनेशी सांगड:

शरद पवारांनी फळबाग लागवड योजनेची रोजगार हमी योजनेशी सांगड घातली. रोजगार हमी योजनेचा निधी फळबाग व पाणलोट क्षेत्राच्या विकासासाठी वापरण्याचा निर्णय घेतला.'गावाचा विकास' हे सूत्र मानून सन १९९० –९१ वर्षापासून रोजगार हमीच्या माध्यमातून फळबाग लागवड कार्यक्रम राबविला. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून आज अखेर फलोत्पादनावर ११०० कोटीहून अधिक रक्कम खर्च करण्यात आली. फलोत्पादन कार्यक्रमाबाबत सरकारने एक पुस्तिका प्रकाशित केली. यामध्ये म्हटले आहे की,''शेतीतील उत्पादकता, शेतकऱ्यांचे परिश्रम, शासनाचे आर्थिक आणि सक्रीय पाठबळ अशा तीन स्तरांवर राबविली जाणारी ही महत्त्वाकांक्षी योजना महाराष्ट्रातील कोरडवाहू जमीन असणाऱ्या लक्षावधी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत निश्चितपणे बदल घडवून आणू शकेल.''

फळझाड पिकांच्या पिकवार संघटना:

राज्यात फलोत्पादन कार्यक्रम यशस्वी व्हायचा असेल तर आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज व्हावयाचे असेल तर फळझाड पिकांच्या पिकवार संघटना स्थापन केल्या पाहिजेत हा विचार शरद पवारांनी मांडला व त्याची कार्यवाही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मार्फत करण्याचा निर्णय घेतला. या माध्यमातून,'महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ','महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक संघ','महाराष्ट्र राज्य संत्रा उत्पादक संघ','महाराष्ट्र राज्य चिक्कू उत्पादक संघ','महाराष्ट्र राज्य डाळिंब उत्पादक संघ','महाराष्ट्र राज्य बोर उत्पादक संघ', अशा पिकवार संघटना निर्माण झाल्या.'महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ' ही संघटना स्थापन करण्यात व तिला देश व जागतिक पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देण्यात शरद पवार यांचा सिंहाचा वाटा आहे.[१३] हवाई मार्गाबरोबरच फळांची निर्यात समुद्रमार्गाने करण्याची पहिली सुरुवात द्राक्ष परदेशात पाठवून द्राक्ष बागायतदार संघाने केली. या साठी शीतपेट्या, शीतगृहे, रेफ्रिजरेटेड कंटेनर्सची सुविधा या संघाने केली. अशा प्रकारे शीत साखळी (कोल्डचेन) निर्माण करणारी 'महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ' ही शेतकऱ्यांची पहिली संघटना होय.

कृषिक्षेत्रात वैविध्यता निर्माण होण्याबाबत शरद पवार म्हणतात की,''भारतातील शेतकऱ्यांनी भाजीपाला, फुले उत्पादन, रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन यासारख्या अन्य जोडधंद्याची जोड दिली पाहिजे. त्याद्वारे कृषी क्षेत्रात विविधता निर्माण होईल.''

फलोत्पादक कार्यक्रमाचे फलित:

शरद पवारांच्या क्रांतिकारी फळबाग योजनेमुळे पडिक जमिनीचा विकास झाला. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला. महाराष्ट्र हे देशात फलोत्पादनाच्या क्षेत्रात पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले. बंगलोर येथे केंद्र सरकारने आयोजित केलेल्या फलोत्पादन प्रदर्शनात महाराष्ट्राला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. फळे, फुले व भाजीपाला उत्पादनासंबंधीची प्रथम व द्वितीय क्रमांकाची प्रत्येकी १२ अशी २४ बक्षिसे मिळाली. अशी मोठ्या संख्येने बक्षिसे मिळविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले.[१४] त्यामुळेच आंतरराष्ट्रीय किर्तीचे कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन शरद चंद्रजी पवार यांचा गौरव **'फलोत्पादन क्रांतीचे जनक'** असा करतात.[१५]

सारांश:

शरद पवारांनी कृषी विकासासाठी अनेक प्रयोग केले. सन १९९० मध्ये महाराष्ट्रात फळबाग योजना राबविली. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला. शेती लागवडीखाली आली. महाराष्ट्र फलोत्पादनात देशात अग्रेसर ठरला. याचे श्रेय शरदचंद्रजी पवार व महाराष्ट्रातील लक्षावधी शेतकऱ्यांना आहे.

संदर्भ सूची:—

१) प्रा.डॉ.पाटील विमला, 'शरद पवार, कार्यकर्तृत्वाचा अखंड प्रवाह' प्रिंट ओम ऑफसेट, पृ.३६
२) कित्ता पृ.३९
३) ॲड कांडगे राम, 'लोकनेते शरदराव पवार', राजश्री प्रकाशन, पुणे, पृ.६३
४) कित्ता पृ.६२३
५) पवार शरद, उपरोक्त, पृ.२१५
६) लोकनेते शरद पवार, उपरोक्त, पृ.४४५
७) कित्ता पृ.४४६
८) कित्ता पृ.४५०
९) महाराष्ट्र टाइम्स, दि.२७ सप्टेंबर, १९९३
१०) फडवणीस जगण, 'शरद पवार धोरणे आणि परिणाम', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.१३०
११) लोकनेते शरद पवार, उपरोक्त, पृ.४५१
१२) कित्ता पृ.४५२
१३) कित्ता पृ.४५४
१४) कित्ता पृ.४५३
१५) देशपांडे पद्मभूषण, 'पर्व प्रगतीचे, परिवर्तनाचे', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पृ.५६